<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०२२ मधील निशाणी ८४ खालील आदेश</u>

<u>(CNR-NO- MHRT08-000348-2022)</u>

वादीने सदरचा अर्ज हा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ०५ यांच्या निधनानंतर त्यांचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी व निशाणी ०१ मध्ये प्रतिवादी क्र ०५ यांच्या नावासमोर 'मयत' असे लिहिण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. सबब, मुळ दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी, याकरीता हा अर्ज केलेला आहे.

०२. इतर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे म्हणणे दाखल केले आहे. सदर मयताच्या प्रस्तावित प्रतिवादींना नोटीस काढण्यात आली असता, नोटीस मिळुनही ते हजर न झाल्याने त्यांचेविरुध्द अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

०३. वादी व इतर प्रतिवादींना ऐकले. अभिलेख पाहिले.

०४. प्रस्तुतचा दावा हा ठराव व सरस–निरस–मानाने वाटप व स्वतंत्र कब्जासाठी दाखल करण्यात आला आहे. निशाणी क्रमांक ७९ कडील शेवंती धोंडु वेलोंडे यांचे मृत्यूप्रमाणपत्र पाहिले असता, त्यांचा मृत्यू दिनांक २९/०२/२०२४ रोजी झाल्याचे दिसुन येते. सदर मयत प्रतिवादीचे आडनाव दाव्यात व प्रस्तुत अर्जात येलोंडे असे नमुद असुन मृत्यूप्रमाणपत्रात मात्र ते वेलोंडे असे नमुद असल्याचे दिसुन येते. त्याबाबत इतर प्रतिवादी यांनी कोणतेही हरकत मांडलेली नाही. प्रस्तावित वारस यांनी देखील संधी मिळुनही

सदर अर्जावर म्हणणे मांडुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. वादीने सदर अर्जासोबत शपथपत्र सादर केले असुन त्यामध्ये प्रतिवादी क्र. ०५ शेवंती धोंडु येलोंडे हिचा मृत्यू २९/०२/२०२४ रोजी झाल्याचे शपथेवर कथने केले आहे. त्यामुळे ते नाकारण्यास कोणतेही कारण नाही.

**०५**. सबब, दाव्याचे स्वरुप पाहता, सदर मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणे व सदर प्रतिवादीच्या नावासमोर 'मयत' असा उल्लेख करणे गरजेचे आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येतो–

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्रमांक ८४ हा न्यायालयात रक्कम रुपये २००/– (रक्कम रुपये दोनशे मात्र) इतका खर्च भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मुदतीत आदेशान्वये आवश्यक ती पुर्तता करुन दाव्यात दुरुस्ती करावी. तसेच दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत अभिलेखावर मुदतीत दाखल करावी व त्याची प्रत विरुध्द पक्षास मुदतीत देण्यात यावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.11.14 11:42:25 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दि. १०/११/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

| -: **C E R T I F I C A T E** :- | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 10/11/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 10/11/2025 |
| Order uploaded on | : | 14/11/2025 |